ज्ञानदानातून समाजऋण फेडणाऱ्या 'वरदा क्लासेस'च्या संचालिका सुनिता महामुनी यांची प्रेरणादायी यशोगाथा

शिकवण्याची आवड, मनातील अढळ जिद्द आणि सामाजिक बांधिलकीची भावना असेल, तर शून्यातूनही यशाचे उत्तुंग शिखर कसे गाठता येते, याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे चऱ्होली येथील 'वरदा क्लासेस' आणि त्याच्या संस्थापिका व संचालिका सुनिता महामुनी (M.SC., B.ED., सुवर्णपदक). पूर्वी मॅगझिन चौक परिसरातील सयाजी नाथ महाराज विद्यालय, मोजे स्कूलमध्ये शिक्षिका म्हणून कार्यरत असताना त्यांचा विद्यार्थ्यांशी अत्यंत जवळून स्नेह जुळला होता.

मात्र, प्रापंचिक जबाबदाऱ्यांमुळे त्यांना पूर्णवेळ नोकरी करणे शक्य झाले नाही. असे असले तरी, त्यांच्यातील उपजत शिक्षकी पेशा आणि शिकवण्याची तळमळ त्यांना शांत बसू देत नव्हती. त्या काळी चऱ्होली परिसरात स्थानिक पातळीवर उत्तम क्लासेसची सुविधा नसल्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी दिघी किंवा थेट भोसरीपर्यंत पायपीट करावी लागायची. विद्यार्थ्यांची हीच अडचण ओळखून आणि स्वतःच्या शिकवण्याच्या आवडीला वाट करून देण्यासाठी सुनिताताईंनी २००८ मध्ये केवळ नऊ विद्यार्थ्यांपासून चऱ्होलीत वरदा क्लासेसची मुहूर्तमेढ रोवली. शून्य भांडवल असताना स्थानिक ग्रामस्थांची मोलाची मदत, माणूसकी आणि आत्मीयतेच्या जोरावर हा शैक्षणिक प्रवास सुरू झाला. या वाटचालीत चऱ्होलीच्या काळे मॅडम, माजी महापौर नितीन काळजे आणि त्यांचे चुलत भाऊ संतोष निकाळजे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

पहिल्या वर्षी केवळ ९ विद्यार्थ्यांपासून सुरू झालेल्या या वर्गात दुसऱ्या वर्षी २० विद्यार्थी दाखल झाले आणि पाहता पाहता वरदा क्लासेसची ख्याती पंचक्रोशीत पसरू लागली. अल्पावधीतच गुणवत्ता आणि विश्वासाच्या बळावर क्लासेसच्या शाखा विस्तारल्या आणि एकेकाळी अवघ्या नऊ मुलांनी सुरू झालेला हा प्रवास आज ६५० हून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत येऊन पोहोचला आहे. कोणतीही जाहिरातबाजी न करता केवळ गुणवत्तेवर टिकून राहिलेली विश्वासार्हता हेच या यशाचे खरे गमक ठरले आहे. मुळात वरदा क्लासेसची स्थापना हा व्यवसाय म्हणून नव्हे, तर समाजाचे आपण काहीतरी देणे लागतो या भावनेतून झाली होती. आजूबाजूला असणारा

कष्टकरी शेतकरी, मजूर आणि कामगार वर्ग डोळ्यांसमोर ठेवून सुनिताताईंनी अतिशय अल्प दरात विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्याचे धोरण ठेवले. इतकेच नव्हे, तर समाजातील दुर्बल घटकांतील आणि अनाथ आश्रमातील प्रतिकूल परिस्थिती असलेल्या होतकरू मुलांना त्यांनी नेहमीच मोफत शिक्षण दिले. जेव्हा हीच वंचित मुले आपल्या कर्तृत्वाने संस्थेचे नाव उंचावतात, तेव्हा मिळणारा आनंद कोणत्याही पैशात मोजता येत नाही, अशी भावना त्या व्यक्त करतात. त्याचेच एक बोलके उदाहरण म्हणजे, वडील टेम्पो चालक असताना अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत जिद्दीने अभ्यास करून 'सीईटी' परीक्षेत सुयश मिळवून एक लाख रुपयांच्या शिष्यवृत्ती पटकावलेली वरदा क्लासेसची विद्यार्थिनी विशाखा. तिची निवड अवसरी येथील नामांकित शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात झाली असून ती उच्च शिक्षण घेत आहे.

सध्याच्या शिक्षण व्यवस्थेविषयी आणि बदलत्या शैक्षणिक वातावरणाविषयी बोलताना सुनिताताई अत्यंत मोकळेपणाने आपले विचार मांडतात. त्यांच्या मते, पूर्वी शालेय स्तरावर आठवीपर्यंत सरसकट पास करण्याचा नियम नव्हता. त्यामुळे मुलांमध्ये आणि पालकांमध्ये शालेय परीक्षांचे, अभ्यासाचे एक गांभीर्य असायचे आणि आकलनशक्ती सर्वाधिक असण्याच्या वयातच मुलांचा शिक्षणाचा पाया पक्का व्हायचा. परंतु, आता आठवीपर्यंत सरसकट उत्तीर्ण करण्याच्या धोरणातील त्रुटींमुळे गुणवत्ता ढासळली असून अनेक विद्यार्थ्यांना आठवी-दहावीत आल्यानंतरही नीट लिहिता-वाचता येत नाही, ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. तंत्रज्ञान शिक्षण समृद्ध करण्यासाठी उत्तम असले तरी अलीकडे त्याचा गैरवापर वाढला आहे. मुलांमध्ये वैचारिक पातळीचा अभाव, पालकांचे दुर्लक्ष आणि ज्येष्ठांविषयीच्या आदराची भावना कमी होत असल्याचे विदारक चित्र दिसते. शिक्षण, तंत्रज्ञान आणि वाढत्या सोयी-सुविधांच्या जंजाळात पाल्य आणि पालकांमध्ये भावनिक दुरावा वाढत चालला आहे. मुलांमधील आत्मविश्वास, वरिष्ठांविषयीची आदरभावना आणि समोरच्याचे ऐकून घेण्याची मनोवृत्ती कमी होत असल्याने पालकांनी मुलांना जास्तीत जास्त गुणवत्तापूर्ण वेळ देणे अत्यंत गरजेचे बनले आहे.

वरदा क्लासेसमध्ये केवळ पुस्तकी ज्ञान न देता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध पूरक उपक्रमही सातत्याने राबवले जातात. यामध्ये अमोल देवकर सरांच्या विशेष कार्यशाळांचे आयोजन करून विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन दिले जाते. दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी वर्षभराचे आणि आठवड्याचे काटेकोर नियोजन केले जाते. दर रविवारी नियमित परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांच्या त्रुटींवर बारकाईने काम केले जाते आणि त्याबाबत पालकांना वेळोवेळी अवगत केले जाते. आज वाघेश्वर विद्यालय, इंग्रजी स्कूल, गायत्री इंग्लिश स्कूल, एसपीजी स्कूल, पीडीएफ इंग्लिश मीडियम स्कूल, आरकेएल स्कूल, पुणे इंटरनॅशनल स्कूल अशा विविध शाळांमधील विद्यार्थी वरदा क्लासेसच्या माध्यमातून घवघवीत यश संपादन करत आहेत. जेव्हा जुने विद्यार्थी, मग ते पोलीस उपनिरीक्षक (PSI) सारख्या उच्च पदावर पोहोचलेले असोत वा इतर क्षेत्रांत यशस्वी झालेले, मोठ्या आदराने आणि कृतज्ञतेने भेटायला येतात, तेव्हा तो क्षण संस्थेसाठी अत्यंत अभिमानास्पद असतो. अशा यशस्वी विद्यार्थ्यांना वर्गात बोलावून नवीन विद्यार्थ्यांशी संवाद घडवून आणला जातो, ज्यामुळे नवीन पिढीला प्रत्यक्ष यशाची प्रेरणा मिळते. मूल्यांची जपणूक, सामाजिक जाणीव आणि अविरत परिश्रमांच्या बळावर सुरू असलेला वरदा क्लासेसचा हा शैक्षणिक यज्ञ चऱ्होली आणि पंचक्रोशीत विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भविष्य घडवणारा दीपस्तंभ ठरत आहे.

Guruvarya Academy School

CBSE School in Chikhali, Pune

Our Vision : Complementary skills include linguistic, mathematical and scientific, artistic, physical, and social. A curious, curious mind with a passion for learning. Respect for other students and tolerance. We are grateful for the relationship between parents, school andcommunity and how it contributes to thedevelopment of our young students.



Near, Gitai Colony, Chikhali, Vitthal Nagar, Pimpri-Chinchwad, Maharashtra 411062

7410001573 / 7410001578 I guruvaryaacademy7@gmail.com

निष्पक्ष पत्रकारिता,
अचूक बातम्या आणि
जनतेच्या प्रश्नांना नेहमीच
न्याय देणारे पिंपरी-चिंचवडचे
आपले लाडके न्यूज पोर्टल
१३ वा वर्धापन दिन
न्यूज मराठी एक्सप्रेस
च्या १३ व्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा.!
डॉ.सुहास लक्ष्मण कांबळे
एम.एस.(ऑर्थो)
नगरसेवक/ सदस्य-मा. शहर सुधारणा समिति, पिं.चि, मनपा
निरंतर विश्वास पिंपरी-चिंचवडकरांचा, संकल्प शहराच्या शाश्वत विकासाचा..!

निष्पक्ष पत्रकारिता,
अचूक बातम्या आणि
जनतेच्या प्रश्नांना नेहमीच
न्याय देणारे पिंपरी-चिंचवडचे
आपले लाडके न्यूज पोर्टल
१३ वा वर्धापन दिन
न्यूज मराठी एक्सप्रेस
च्या १३ व्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा.!
सौ.नम्रता योगेश लोंढे
नगरसेविका पिं.चिं.मनपा
श्री.योगेश भगवान लोंढे
संस्थापक-राजर्षी शाहू महाराज प्रतिष्ठान
namrata_londhe1010

निष्पक्ष पत्रकारिता,
अचूक बातम्या आणि
जनतेच्या प्रश्नांना नेहमीच
न्याय देणारे पिंपरी-चिंचवडचे
आपले लाडके न्यूज पोर्टल
१३ वा वर्धापन दिन
न्यूज मराठी एक्सप्रेस
च्या १३ व्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा.!
काळूराम बारणे
• चिंचवड विधानसभा निवडणूक प्रमुख भाजपा
Kaluram Barne ikalurambarne KaluramhBarne kalurambarne.in

निष्पक्ष पत्रकारिता,
अचूक बातम्या आणि
जनतेच्या प्रश्नांना नेहमीच
न्याय देणारे पिंपरी-चिंचवडचे
आपले लाडके न्यूज पोर्टल
१३ वा वर्धापन दिन
न्यूज मराठी एक्सप्रेस
च्या १३ व्या
वर्धापन
दिनानिमित्त
हार्दिक
शुभेच्छा.!
ज.न.से.व.क
प्रविणशेठ भालेकर
• नगरसेवक,
पिं.चिं. महानगरपालिका
pravinbhalekar_

निष्पक्ष पत्रकारिता,
अचूक बातम्या आणि
जनतेच्या प्रश्नांना नेहमीच
न्याय देणारे पिंपरी-चिंचवडचे
आपले लाडके न्यूज पोर्टल
१३वा वर्धापन दिन
न्यूज एक्सप्रेस मराठी
च्या १३ व्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा.!
सचिन श्रीधर तापकीर
नगरसेवक पिं.चिं. महानगरपालिका
sachintapkirbjp

निष्पक्ष पत्रकारिता,
अचूक बातम्या आणि
जनतेच्या प्रश्नांना नेहमीच
न्याय देणारे पिंपरी-चिंचवडचे
आपले लाडके न्यूज पोर्टल
१३वा वर्धापन दिन
न्यूज एक्सप्रेस मराठी
च्या १३ व्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा.!
श्री.राम हनुमंत वाकडकर
उपाध्यक्ष भारतीय जनता पार्टी पिंपरी चिंचवड शहर
सौ.श्रुती राम वाकडकर
सदस्या, शिक्षण समिती पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसेविका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

निष्पक्ष पत्रकारिता,
अचूक बातम्या आणि
जनतेच्या प्रश्नांना नेहमीच
न्याय देणारे पिंपरी-चिंचवडचे
आपले लाडके न्यूज पोर्टल
१३वा वर्धापन दिन
न्यूज एक्सप्रेस मराठी
च्या १३ व्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा.!
श्री. सुहास सोपान ताम्हाणे
युवा उद्योजक

विशाल कार्याची वाटचाल
निष्पक्ष पत्रकारिता,
अचूक बातम्या आणि
जनतेच्या प्रश्नांना नेहमीच
न्याय देणारे पिंपरी-चिंचवडचे
आपले लाडके न्यूज पोर्टल
१३वा वर्धापन दिन
न्यूज एक्सप्रेस मराठी
च्या १३ व्या
वर्धापन
दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा.!
श्री.विशाल विलास आहेर
(युवा नेते)

निष्पक्ष पत्रकारिता,
अचूक बातम्या आणि
जनतेच्या प्रश्नांना नेहमीच
न्याय देणारे पिंपरी-चिंचवडचे
आपले लाडके न्यूज पोर्टल
१३ वा वर्धापन दिन
न्यूज एक्सप्रेस
मराठी
च्या १३ व्या वर्धापन
दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा.!
महेश किसनराव लांडगे
आमदार, भाजपा पिंपरी-चिंचवड (पुणे)
/MaheshKLandge +91 9379909090

निष्पक्ष पत्रकारिता, अचूक बातम्या
आणि जनतेच्या प्रश्नांना नेहमीच
न्याय देणारे पिंपरी-चिंचवडचे
आपले लाडके न्यूज पोर्टल
मराठी
न्यूज एक्सप्रेस
च्या १३ व्या वर्धापन
दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा.!
१३वा
वर्धापन
दिन
सौ. शितलताई धनंजय वर्णेकर
नगरसेविका पिंपरी चिंचवड महानगरपालिका
स्थायी समिती सदस्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.श्री. धनंजय (सर)वर्णेकर
संस्थापक अध्यक्ष : केंब्रिज ग्रुप ऑफ स्कूल

निष्पक्ष पत्रकारिता, अचूक बातम्या
आणि जनतेच्या प्रश्नांना नेहमीच
न्याय देणारे पिंपरी-चिंचवडचे
आपले लाडके न्यूज पोर्टल
मराठी
न्यूज एक्सप्रेस
च्या १३ व्या वर्धापन
दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा.!
१३वा
वर्धापन
दिन
श्री.तुषार भिवाजी सहाणे
नगरसेवक : पिं.चिं. महानगरपालिका
सदस्य : विधी समिती पिंपरी चिंचवड मनपा मा. प्रमुख विश्वस्त, श्री मार्तंड देवसंस्थान, जेजुरी
tushar.sahane | Tushar Sahane

देवराज क्लिनिक

डॉ. तेजस्वी कुंभारे (पुजारी)
(B.A.M.S.) (Mum) PGDEMS (Hinduja)
9420780414
9595815656

पचन संस्थेचे विकार
* अंगावर पित्त उठणे * पित्ताचे - खडे
* आम्लपित्त (Acidity) * अपचन गॅसेस
* कोलायटीस * मुळव्याध * आव पडणे
* अल्सर * बध्दकोष्ठ (Constipation)
* वारंवार तोंड येणे

हाडांचे विकार
* संधीवात * गुडघेदुखी * टाच दुखणे * लंबॅगो
* आमवात * सायटीका * स्पॉन्डिलायसिस
* मान, पाठ कंबरदुखी * मणक्यातील गॅप
* हातपाय बधीर होणे * फ्रोझन शोल्डर
* हातापायांना मुंग्या येणे * स्लिपडिस्क

श्वसन संस्थेचे विकार
* जुनाट सर्दी * खोकला
* दमा * बालदमा
* सायनुसायटीस
* टॉन्सिल्स * ॲलर्जीची सर्दी
* धाप लागणे

त्वचा विकार
* मुरूम (Pimples) * चहऱ्यावरील वांग
* चेहऱ्यावरील डाग * पुटकुळ्या
* सोरियासिस (Psoriasis)
* चाई * जुनाट इसब (Eczema)
* पांढरे डाग / कोड

मुत्र संस्थेचे विकार
* मुतखडा
* प्रोस्टेट ग्रंथीची वाढ
* किडनी संदर्भातील विकार

केसांचे विकार
* केस गळणे * केस पातळ होणे
* कोंडा होणे
* केस अकाली पांढरे होणे

❖ रक्तदाब (ब्लडप्रेशर) ❖ रक्तवाहिन्यांचे विकार ❖ मधुमेह (डायबेटीस) ❖ ॲनिमिया (रक्तक्षय)
❖ निद्रानाश ❖ जळवात ❖ ॲलर्जीची सर्दी ❖ पाठीच्या मणक्याची विकृती ❖ वंध्यत्व
❖ शुक्राणूंची संख्या कमी असणे ❖ लैंगिक समस्या ❖ स्त्रियांच्या तक्रारी ❖ थायरॉईडच्या तक्रारी
❖ अंगावर पित्त उठणे ❖ पित्ताशयातील खडे ❖ डोकेदुखी / अर्धशिशी (मायग्रेन)
❖ उंची वाढविणे ❖ वजन वाढविणे व कमी करणे

सुविधा उपलब्ध : रक्त तपासणी / सुवर्णामृतप्राशन

* स्नेहन * स्वेदन * शिरोधारा
* नस्य * वमन * विरेचन
बस्ति इत्यादी पंचकर्मांची शाखोक्त पध्दतीने सोय

देवराज क्लिनिक
शुभंकरोति बिल्डींग, शिवम मार्केटजवळ, ट्रफिक पार्क समोर,
सेक्टर नं. ४, (किडजी शाळेजवळ) मोशी प्राधीकरण, भोसरी.
संपर्क : मो. नं. : ९४२०७८०४१४/९५९५८१५६५६

निष्पक्ष पत्रकारिता,
अचूक बातम्या आणि
जनतेच्या प्रश्नांना नेहमीच
न्याय देणारे पिंपरी-चिंचवडचे
आपले लाडके न्यूज पोर्टल

१३ वा वर्धापन दिन

न्यूज एक्सप्रेस मराठी

च्या १३ व्या
वर्धापन दिनानिमित्त
हार्दिक शुभेच्छा.!

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार

विशाल शंकर वाकडकर
प्रदेशाध्यक्षः महाराष्ट्र प्रदेश
राष्ट्रवादी युवक काँग्रेस शरदचंद्र
पवार (शहर)

Vishal Shankar Wakadkar | VishalWakadkar | 9850999997, 8235909090

निष्पक्ष पत्रकारिता, अचूक बातम्या
आणि जनतेच्या प्रश्नांना नेहमीच
न्याय देणारे पिंपरी-चिंचवडचे
आपले लाडके न्यूज पोर्टल

१३ वा वर्धापन दिन

न्यूज एक्सप्रेस मराठी

च्या १३ व्या वर्धापन
दिनानिमित्त हार्दिक शुभेच्छा.!

यश दत्ताकाका साने
नगरसेवक/सदस्य -शिक्षण समिती पिंपरी चिंचवड मनपा
दत्ताकाका साने प्रतिष्ठान

MAHARSHI DR. D. Y. PATIL SHIKSHAN SANSTHA
BUD'S INTERNATIONAL SCHOOL
Buds International School
Affiliated To CBSE Delhi
Affiliation No. 1130546
ADMISSIONS OPEN FOR 2026-27
GRADE NURSERY & STD. 11th
Limited Seats Available
CBSE CURRICULUM
Certified & Experienced Teachers
Good Infrastructure
Quality Education
Active Learning
Interactive Atmosphere
E-learning
Pickleball & Basketball & Football Ground
Certified Physical Instructor
ACTIVITIES & AMINITIES
Art, Dance, Music & Drama Clubs.
Yoga, Karate, MCF, Chess Club
Football, Kho-Kho, Kabbadi, Playground
Camera Surveillance with voice recording
Call Now 9834769822/ 9309796885
smdypbudsschool1@gmail.com
www.budsinternationalschools.com
1029/30/31, Newale Vasti, Nr. PCMC RTO, Next to Spine Road, Chikhali, Pune - 411 062

तेरा वर्षांचा विश्वासाचा प्रवास..!

स्थानिक प्रश्नांना शब्द, नागरिकांच्या अपेक्षांना व्यासपीठ

शहराची ओळख केवळ उंच इमारती, रुंद रस्ते आणि मोठ्या प्रकल्पांतून घडत नाही. ती घडते तिथल्या माणसांमधून, त्यांच्या कष्टांतून आणि चांगल्या उद्याच्या अपेक्षांतून. या माणसांचे जगणे समजून घेणे, त्यांच्या प्रश्नांना शब्द देणे आणि सत्तेच्या केंद्रापर्यंत त्यांचा आवाज पोहोचविणे, ही स्थानिक पत्रकारितेची महत्त्वाची जबाबदारी आहे. याच जाणिवेतून एक्सप्रेस मीडिया इंटरप्राईझेस, पुणे यांच्या माध्यमातून सुरू झालेले 'न्यूज एक्सप्रेस मराठी' हे ऑनलाइन वृत्तपत्र गेल्या तेरा वर्षांपासून पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या वाचकांशी जोडलेले आहे. वर्धापन दिनाचा हा क्षण आनंदाचा आहे; तितकाच आपल्या कामाकडे सजगपणे पाहण्याचाही आहे. वाचकांनी दिलेला विश्वास जपताना बदलत्या काळातील पत्रकारितेच्या जबाबदाऱ्या अधिक स्पष्टपणे स्वीकारण्याचा हा प्रसंग आहे.

बदलत्या शहरासोबत बदलत्या अपेक्षा

गेल्या काही वर्षांत पुणे आणि पिंपरी-चिंचवडचा विस्तार झपाट्याने झाला. उद्योग, माहिती तंत्रज्ञान, शिक्षण आणि रोजगाराच्या संधींमुळे विविध भागांतील माणसे येथे स्थायिक झाली. नव्या वस्त्या उभ्या राहिल्या, गावांचे शहरीकरण झाले आणि नागरी सुविधांवरील ताणही वाढला.

पाणीपुरवठा, वाहतूक, सार्वजनिक आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, गृहनिर्माण आणि रोजगार हे विषय प्रत्येक कुटुंबाच्या दैनंदिन जगण्याशी जोडलेले आहेत. एखाद्या परिसरातील पाणीटंचाई ही तेथील नागरिकांची रोजची धावपळ असते. रुग्णालयातील औषधांचा तुटवडा हा कुटुंबाच्या खर्चाचा प्रश्न असतो. शाळेसमोरील असुरक्षित रस्ता हा पालकांच्या मनातील काळजीचा विषय असतो. अशा प्रश्नांकडे माणसांच्या अनुभवांतून पाहणारी पत्रकारिता शहराला आवश्यक आहे. 'न्यूज एक्सप्रेस मराठी'च्या पुढील वाटचालीतही ही स्थानिक जाणीव केंद्रस्थानी राहावी, ही आमची भूमिका आहे.

स्थानिक पत्रकारितेचे सामर्थ्य

लोकशाहीतील मोठ्या निर्णयांचा परिणाम शेवटी नागरिकांच्या घरापर्यंत पोहोचतो. महापालिकेचा अर्थसंकल्प, विकास आराखडा, करधोरण, भूसंपादन किंवा सार्वजनिक प्रकल्प यांचा सामान्य माणसाच्या जीवनाशी थेट संबंध असतो. मात्र, प्रशासकीय भाषेतील माहिती आणि नागरिकांना आवश्यक असलेले स्पष्ट उत्तर यांत अनेकदा अंतर राहते.

हे अंतर कमी करणे, निर्णयांचा अर्थ सोप्या भाषेत सांगणे आणि नागरिकांना आपले प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे, हे स्थानिक माध्यमाचे महत्त्वाचे काम आहे. घोषणा झाल्यानंतर पुढे काय झाले, मंजूर काम प्रत्यक्षात कुठपर्यंत आले आणि दिलेल्या आश्वासनाची पूर्तता झाली का, हे विचारण्याची सातत्यपूर्ण वृत्ती पत्रकारितेला अर्थ देते.

त्याचबरोबर शहरातील विधायक प्रयत्नांचीही नोंद व्हायला हवी. शिक्षकांचे उपक्रम, विद्यार्थ्यांचे यश, कामगारांचे योगदान, उद्योजकांचे प्रयत्न आणि सामाजिक संस्थांचे कार्य यांतून शहराची सकारात्मक जडणघडण समोर येते. प्रश्न विचारण्याइतकेच चांगल्या कामाची दखल घेणेही आवश्यक आहे.

डिजिटल वेगाला विश्वासार्हतेची जोड

ऑनलाइन माध्यमांमुळे बातमी वाचकांपर्यंत पोहोचण्याचा वेग वाढला आहे. मोबाइलवरील एका क्लिकमुळे स्थानिक घडामोडी दूरवर पोहोचतात. या सहज उपलब्धतेसोबत माध्यमांची जबाबदारीही वाढली आहे.

माहितीचा स्रोत तपासणे, संबंधितांची बाजू जाणून घेणे, आरोप आणि सिद्ध तथ्य यांतील फरक स्पष्ट ठेवणे आणि चूक झाल्यास दुरुस्ती करणे, ही विश्वासार्ह पत्रकारितेची मूलभूत शिस्त आहे. आकर्षक मथळ्याने वाचकाचे लक्ष वेधले जाते; अचूक आणि संदर्भासहित माहितीमुळे त्यांचा विश्वास टिकतो.

बातमी, मत आणि जाहिरात यांची ओळख वाचकाला स्पष्टपणे करता आली पाहिजे. व्यक्तीच्या प्रतिष्ठेचा आदर, संवेदनशील घटनांतील संयम आणि सार्वजनिक हिताचे भान ही मूल्ये डिजिटल माध्यमातही तितकीच आवश्यक आहेत. तेरा वर्षांच्या प्रवासानंतर पुढील वाटचालीसाठी हीच आमची दिशादर्शक तत्त्वे आहेत.

वाचकांचा सहभाग हीच खरी ताकद

कोणत्याही माध्यमाचा प्रवास त्याच्या वाचकांशिवाय पूर्ण होत नाही. बातमी वाचणारा, सूचना करणारा, परिसरातील प्रश्न निदर्शनास आणून देणारा आणि गरज पडल्यास माध्यमालाही प्रश्न विचारणारा वाचक पत्रकारितेला अधिक सजग करतो.

'न्यूज एक्सप्रेस मराठी'शी जोडलेल्या वाचकांचे, सहकाऱ्यांचे, वार्ताहरांचे, लेखकांचे, जाहिरातदारांचे आणि हितचिंतकांचे या वर्धापन दिनानिमित्त मनःपूर्वक आभार. आपल्या सहकार्यामुळे या प्रवासाला सातत्य आणि बळ मिळाले. आपण दिलेला विश्वास आमच्यासाठी पुढील कामाची जबाबदारी आहे.

पुढील वाटचालीचा संकल्प

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि लगतच्या महानगर प्रदेशाचे प्रश्न आता अधिक परस्परावलंबी झाले आहेत. वाहतूक, पाणी, नद्या, प्रदूषण आणि रोजगार यांचा विचार करताना शहरांच्या प्रशासकीय सीमांपलीकडे पाहावे लागते. या बदलांचे नागरिकांच्या जीवनावर होणारे परिणाम समजून घेणाऱ्या पत्रकारितेची गरज वाढत आहे. आगामी काळात स्थानिक प्रश्नांचा सखोल अभ्यास, कागदपत्रांवर आधारित वृत्तांकन, तरुणांच्या अपेक्षांना स्थान आणि नागरिकांना उपयुक्त माहिती यांवर भर देण्याचा आमचा संकल्प आहे. वाचकांशी संवाद अधिक दृढ करत समाजातील विविध घटकांचे अनुभव समोर आणण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू.

या विशेषांकातूनही आपल्या परिसराचे प्रश्न, कर्तृत्ववान माणसे आणि भविष्यातील संधी यांचा वेध घेण्याची आमची भावना आहे. तेरा वर्षांच्या आठवणी जपताना नव्या जबाबदाऱ्यांसाठी सज्ज होण्याची ही वेळ आहे.

आपले प्रेम, सूचना आणि चिकित्सक साथ अशीच लाभत राहो. 'न्यूज एक्सप्रेस मराठी'च्या पुढील वाटचालीतही वाचकांचा विश्वास आणि सार्वजनिक हित यांनाच सर्वोच्च स्थान राहील.

- मनिषा थोरात-पिसाळ,
संचालिका, एक्सप्रेस मीडिया इंटरप्राईझेस, पुणे.
मुख्य संपादक, न्यूज एक्सप्रेस मराठी.

1950 पासून
नातं विश्वासाचं
SJPL
सोनिगरा ज्वेलर्स
Sona Humara,
Rate Aapka
आजच सोन्याचा दर लॉक करा,
उद्याचा फायदा मिळवा!
एक संधी, तीन आनंद!
मेकिंग चार्जेसवर 50% पर्यंत सूट
आमच्या खास दागिन्यांच्या
संग्रहाचा अनुभव घेण्यासाठी
आजच आमच्या दालनाला भेट द्या.
आपल्या स्वागतासाठी आम्ही
उत्सुक आहोत!
हिऱ्यावर सोनं
सोन्यावर चांदी!
मोफत
T & C APPLY
Sjpl Customer care number : 99776 67333
चिंचवड स्टेशन 9325625142 | भोसरी 9552804000 | हडपसर 9325625106
Diwali Period offer 16th October to 06th November 2026

QR कोड स्कैन करें और मुफ्त उपहार पाएं!
परंपरा की विरासत,
विश्वास की पहचान।
ग्राहक सेवा नंबर
99776 67333
हडपसर | चिंचवड स्टेशन | भोसरी
SJPL
सोनिगरा ज्वेलर्स
१९५० से बरकरार